**<u>नियमित दरखास्त क्र. ०६/२०१९</u>**

**(यमुना वि. शिवाजी व इतर)**

**<u>निशाणी ६ वरील आदेश</u>**

(दिनांक ०९ जुलै, २०१९ रोजी पारित)

१. प्रस्तुतचा अर्ज धनको यांनी गट नं. १३८ क मौजे राजेगाव ता. दौंड जि. पुणे या जमीनीतील उसाचे पिकाचे देयक न्यायालयाचा पुढील आदेश होईपर्यंत स्थगित करण्याचा आदेश शंकरराव पाटील सह. साखर कारखाना लि. बिजवडी ता. इंदापुर जि. पुणे यांना देण्याचा अनुतोष मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदर जमीन यापुढे आदेशात संक्षिप्तेसाठी 'दावा जमीन' असे संबोधण्यात येईल.

२. धनकोचे थोडक्यात म्हणने असे की, गट नं. १३८ क मौजे राजेगाव ता. दौंड जि. पुणे या जमीनीबाबत जाहीर ठरावाचा व ऋणकोने हरकत अडथळा करु नये असा हुकुमनामा झालेला आहे व त्या हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी प्रस्तुतची दरखास्त दाखल केली आहे.

३. दावा जमीनीतील उस पीक शंकरराव पाटील सह. साखर कारखाना भिजवडी ता. इंदापुर जि. पुणे या कारखान्यास गळीतासाठी दिलेले आहे. सदरचे पीक धनकोच्या मालकीबाबत असुन त्या उस पिकाबाबत व त्याच्या मोबदल्याबाबत ऋणको यांचा काही संबध नाही. ऋणको हे सदर साखर कारखान्यातुन स्वताच्या नावे उस बील काढण्याच्या प्रयत्नात आहेत. तसे झाल्यास धनकोचे मोठे अर्थिक नुकसान होणार आहे. अशा परिस्थीतीत संबधित कारखान्यावर दावा जमीनीतील उस पीकाचे बील ऋणको यांना देवु नये व सदरचे बील पुढील आदेश होईपर्यंत साखर कारखान्यात स्थगित ठेवावे या साठी

प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन तसा अनुतोष मागितलेला आहे.

४. प्रस्तुतच्या अर्जावर ऋणको यांनी नि. २४ वर त्यांचे म्हणणे देवुन अक्षेप नोंदवला आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की प्रस्तुत अर्जातील मजकुर खोटा, लबाडीचा व बेकायदेशीर आहे. अर्जात केलेली मागणी व दरखास्तीतील विषय असणारा हुकुमनामा यांचा संबध नाही. वादीने अशा प्रकारच्या मागण्या दाव्यात केल्या नसल्याने तशा प्रकारचा हुकुमनामा झालेला नाही. ऋणको यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे समोर दुसरे अपील क्रं. ५१०४/२०१९ दाखल केलेले आहे व ते न्यायप्रविष्ठ आहे.

५. धनको ज्या उस बीलाबाबत तक्रार करतात त्या उसाच्या लागवडीच्या नोंदी ऋणको यांच्याच नावाने संबधित कारखान्याकडे नोंदवले आहे. सदर उस ऋणको यांच्या मिळकत क्रं. १३८/२, १३८/७ व १३८/४ या शेतजमीनीमधील गळीतास गेलेले आहे. दावा जमीन व या जमीनीचा काहीही संबध नाही. ऋणकोंना त्रास व्हावा त्यांच्या मेहनतीचे पैसे त्यांना मिळु नये म्हणुन प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अशा परिस्थितीत अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

६. धनको व ऋणको यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. धनकोच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, उस दावा मिळकतीतील असल्यामुळे धनकोच्या हिश्या इतके उसाचे देयक रोखणे आवश्यक आहे.

७. ऋणको यांच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, हुकुमनामा हा पैशाच्या वसुली साठी नाही. अशा परिस्थितीत पैशाच्या स्वरुपात त्याची अंमलबजावणी करता येणार नाही. अर्ज दरखास्तीतील अनुतोषाच्या विसंगत आहे. दावा जमीनीतील उस विक्री केल्याबाबत कोणाताही कागदोपत्री पुरावा नाही. विक्री केलेला उस ऋणकोच्या मालकीच्या इतर क्षेत्रातील उस आहे. धनको यांनी दि. १७.०२.२०१९ रोजी दिलेल्या अर्जामध्ये नांगरटीला अडथळा केलयाबाबत नमुद

केलेले आहे. उसाबाबत काही म्हणलेले  नाही अशा परिस्थितीत  अर्ज नामंजुर करण्यात यावा.

८.	धनको व ऋणको यांच्या वकीलांच्या युक्तीवादावरुन खालील मुद्दे माझ्या उदभवले आहेत व त्यावर मी सकारणमिमांसा देत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. धनको मागितल्याप्रमाणे स्थगिती आदेश मिळण्यास पात्र आहे का? | नाही. |
| २.आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## मुद्दा कं. १

९.	धनको यांनी अर्जाच्या पुष्ठयार्थ त्यांचे शपथपत्र तसेच दि. २५.०२. २०१९ रोजी पोलीस स्टेशन दौंड येथे दिलेल्या तक्रार अर्जाची छायाकिंत प्रत दाखल केलेली आहे. सदर प्रतीचे अवलोकन केले असता दि. १७.०२.२०१९ रोजी ऋणको यांनी जमीन नांगरत असताना ट्क्टर अडवुन शिवीगाळ करुन हातपाय तोडण्याची धमकी दिली असल्याचे व तिला तसेच तिच्या पतीला जमीनीतुन हुसकावुन लावल्याचे म्हणले आहे. सदर अर्जात कुठेही उस पिकाबाबत तिने उल्लेख केलेला नाही.

१०.	दावा जमीनीत उस पिक असल्याबाबत तिच्या तोंडी म्हणण्याव्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा तिने दिलेला नाही. दावा जमीनीत हरकत अडथळा करु नये असा हुकुमनामा तिच्या हक्कात झाला असला तरी दावा जमीनीत उसाचे पीक होते व ते साखरकारखान्यास विक्री केल्याबाबत कोणताही पुरावा अर्जाच्या पुष्ठयार्थ अभिलेखात आलेला नाही.

११.	ऋणको यांनी नि. २६/१ ते २६/४ सोबत गट नं. १३८/२,

१३८/७, १३८/४ मौजे राजेगाव ता. दौंडचे सातबारा उता—यांची प्रमाणित प्रती तसेच मुखत्यारपत्राची छायाकिंत प्रत दाखल केलेली आहे. दाखल केलेल्या सातबारा उता—यांचे अवलोकन केले असता ऋणको शिवाजी लोळे यांच्या नावे उस पिकाची ८० गुंठे क्षेत्राची नोंद दिसुन येत आहे. कर्मवीर शंकरराव पाटील साखर कारखाना लि. यांनी नि. १८ सोबत दाखल केलेलया कागदपत्रांचे अवलोकन केले असता गट नं. १३८ मधील ८० गुंठे क्षेत्राची उस लागवड नोंद त्यांच्याकडे असल्याचे दिसुन येत आहे.

१२. गट नं. १३८ क मध्ये उस लागवड केली असल्याचे किंवा त्यामधील उस कारखान्याकडे विक्री करण्यासाठी गेला असल्याबाबत अभिलेखात कोणताही सकृतदर्शनी पुरावा आलेला नाही. या उलट ऋणको यांच्या नावे गट नं. १३८ मध्ये २०१८—२०१९ या कालावधीत उस पिक असल्याबाबतची नोंद कारखान्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दिसुन येत आहे. दावा मिळकतीतील उस पिक धनको किंवा ऋणको यांनी कारखान्यास विक्री केल्याचे सकृत दर्शनी दिसुन येत नाही. अशा परिस्थितीत धनको सदर उस देयक कारखान्याकडेच पुढील आदेश होईपर्यंत स्थगित ठेवण्याचा अनुतोष मिळण्यास पात्र नाही. या निष्कर्षास मी येत आहे म्हणुन मुद्दा क्रं. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्रं. २ च्या उत्तरार्थ पुढील प्रमाणे आदेश करित आहे.

## आदेश

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

दौंड.
दिनांक : ०९/०७/२०१९

(एन. बी. जाधव)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
दौंड, कोर्ट क्र.१.